## नियमित दिवाणी दावा क्र. १३८/२०२४ मधील निशाणी ६२ वरील आदेश
## (तेजस शहा विरुध्द पंकज शहा)
## (**CNR No.MHSN**050010802024)

प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी प्रस्तुत अर्ज विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्याबाबत दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ ते ७ चे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, तिऱ्हाईत इसमाने त्यास प्रस्तुत प्रकरणात समाविष्ठ करुन घेण्याबाबत अर्ज दाखल केल्यामुळे व वादीने वाद मिळकती व्यतिरिक्त ईतर मिळकती समाविष्ठ करण्याबाबत अर्ज दाखल केल्यामुळे प्रतिवादींना कैफियत देता आली नाही. तसेच आवश्यक माहीती अभावी कैफियत तयार करता आली नाही. याशिवाय, प्रतिवादी क्र. १ वयोवृध्द असून त्यांना प्रस्तुत दाव्यामुळे शरिरीक व मानसिक धक्का बसला. परिणामी त्यांचेवर सतत उपचार करणे क्रमप्राप्त ठरले. तसेच प्रतिवादी क्र. ४ यांचेवर व्हेरिकोज व्हेन आजारपणामुळे शस्त्रक्रिया करावी लागली. सबब, सदर कारणांस्तव मुदतीत कैफियत दाखल करणे अशक्य ठरले. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट वादीचे विद्वान विधीज्ञानी असे प्रतिपादन केले की, प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे आजारपणासंदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच वादीने दावा दुरुस्तीकरिता अर्ज दाखल केल्यामुळे प्रतिवादीला विलंबाने कैफियत दाखल करण्याची मुभा आहे असे म्हणता येणार नाही. शेवटी त्यांनी अर्जातील नमूद कारण समर्थनीय नसल्याचे प्रतिपादन करुन

तो नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ ते ७ यांस समन्सची बजावणी होवूनसुध्दा त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही, याबाबत दुमत नाही. प्रश्न केवळ असा आहे की, अर्जातील नमूद कारण समर्थनीय आहे अगर कसे. प्रथमत: वादीनी दाखल केलेल्या दावा दुरुस्तीसंदर्भातील अर्जाबाबत पाहता वादीनी प्रस्तुत दाव्यामध्ये वाद मिळकतींव्यतिरिक्त ईतर मिळकती समाविष्ट करण्याबाबत अर्ज दाखल केल्याचे दिसते. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी दिलेले म्हणणे लक्षात घेता प्रतिवादी क्र. १ ते ७ यांस दाव्यातील कथनांबाबत विशेषत्वेकरुन मिळकती व पक्षकार या संदर्भात इतंभूत माहीती होती असे स्पष्ट होते. सदर बाब लक्षात घेता आवश्यक माहीती अभावी मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही हे कारण संयुक्तीक वाटत नाही. सबब, वादीनी दाखल केलेल्या अर्जामुळे कैफियत दाखल करण्यास अडथळा निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

४. आता प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे तथाकथीत आजारपणामुळे कैफियत दाखल करणे अशक्य ठरले अगर कसे हे पाहणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी मोघमरित्या प्रतिवादी क्र. १ व ४ यांचे आजारपणासंदर्भात कथन केले आहे. वस्तुतः प्रतिवादी क्र. १ ते ७ चे कथनानुसार प्रतिवादी क्र. १ व ४ आजारी असते तर त्यासंदर्भात कागदोपत्री पुरावा दाखल करण्यास कोणतीही अडचण नव्हती. परंतु त्या संदर्भात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. थोडक्यात प्रतिवादी क्र. १ ते

७ यांचा निष्काळजीपणा स्पष्टपणे दिसतो. असे असले तरी उभय पक्षातील वाद पाहता तो वाटपासंदर्भात असल्याचे दिसते. सदर बाब लक्षात घेता प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचे निष्काळजीपणाकरिता त्यांचेवर खर्च लादून कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादीस पुर्वग्रहदुषित ठरणार नाही. याउलट प्रतिवादी क्र. १ ते ७ यास कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास उभयपक्षातील वाद निराकरण योग्यरित्या करण्याकरिता उपयोगी ठरेल. प्राप्त परिस्थिती व उपरोक्त विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेवर खर्च लादून अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांचेवर रुपये २०००/– खर्च लादून अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी पुढील तारखेवर रुपये २०००/– वादीस द्यावेत.

३. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी आदेशाची पुर्तता केल्यास त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

उभय पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.01.17 13:07:41 +0530

इस्लामपूर. (भगवान म. कारलेकर )

दिनांकः–१६/०१/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश व स्तर, इस्लामपूर.